विषय - सहाय्यक लेखाधिकारी वर्ग-3 संवर्गातील कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ लागु करणे बाबत

संदर्भ -1. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.एसआरव्ही1095/प्रक्र.1/95/बारा दि.08/06/1995
2. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन 1999/प्रक्र.2/99/सेवा-3 दि.20/07/2001
3. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन 1109/प्रक्र.44/सेवा-3 दि.01/04/2010
4. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन 1109/प्रक्र.41/सेवा-3 दि.05/07/2010
5. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शा.नि.क्र.वेतन 1111/प्रक्र.08/सेवा-3 दि.01/07/2011
6. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शुध्दीपत्रक क्र.वेतन-1111/प्रक्र.08/सेवा-3 दि.09/12/2016
7. मा.मु.का.अ.जि.प.अ.नगर यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.साप्रवि-1/रवका/696/2016 अहमदनगर दि.17/06/2016
8. कालबध्द पदोन्नती निवड समितीचे इतिवृत्त दिनांक-28/11/2025

जिल्हा परिषद अहिल्यानगर जा.क्र.अर्थ/कार्या-1/आस्था-1/ 482 /2025
अर्थ विभाग **-: आदेश :-** अहिल्यानगर दि.स्वाक्षरी खाली नमुद प्रमाणे

सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.08/06/1995 चे शासन निर्णयानुसार वर्ग-3 व वर्ग-4 मधील कर्मचा-यांना पदोन्नतीची संधी उपलब्ध होत नसल्यामुळे कुंठितता घालविणेकामी दि.01/10/1994 पासुन कालबध्द पदोन्नती योजना लागु करण्यात आलेली असुन एकाच पदावर 12 वर्षाचे नियमित सेवेनंतर पदोन्नतीचे पदाची वेतनश्रेणी मंजुर करणेची तरतुद करणेत आलेली आहे.

तदनंतर वित्त विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दि.01/04/2010 चे शासन निर्णयानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दि.01/10/2006 पासुन लागु करणेत आलेली असुन संपुर्ण सेवा कालावधीत कमाल 02 वेळा पदोन्नतीच्या पदाची वेतन संरचना मंजुर करणेची तरतुद करणेत आलेली आहे. तसेच वित्त विभागाकडील दि.01/07/2011 चे शासन निर्णयातील मुद्दा क्र.01 चे स्पष्टीकरणानुसार दि.01/10/2006 ते दि.31/03/2010 या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय असणार नाही असे कळविण्यात आलेले आहे.

परिणामी खालील नमुद कर्मचारी दि.31/03/2010 पुर्वीच रकाना क्र.6 मध्ये नमुद केलेल्या दिनांकास नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहे. परिणामी सदर कर्मचा-यांना लाभ अनुज्ञेय करण्यात आलेला नाही.

मात्र वित्त विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील दि.09/12/2016 चे शुध्दीपत्रकानुसार जे कर्मचारी दि.01/10/2006 ते दि.31/03/2010 या दरम्यान शासन सेवेतुन सेवानिवृत्त झाले आहेत अथवा निधन पावले आहेत व असे कर्मचारी सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुस-या लाभाच्या अटी व शर्तीची पुर्तता करत असेल तर अशा कर्मचा-यांना सदर योजनेचा दुसरा लाभ मंजुर करावा, मात्र योजनेचा लाभ निवृत्ती वेतन, कुटूंब निवृत्ती वेतन विषयक लाभाकरीताच म्हणजे निवृत्ती वेतन/कुटूंबनिवृत्ती वेतन, सेवानिवृत्ती उपदान/मृत्यु उपदान रजा रोखीकरण या प्रयोजनार्थ देण्यात यावा असे निर्देशित केलेले आहे.संबधित अधिकारी/कर्मचारी यांना दुसरा लाभ मंजूरीच्या अनुषंगाने थकबाकीची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.असे नमुद केलेले आहे.प्रस्तुत बाबत महाराष्ट्र शासन शुध्दीपत्रक क्र.वेतन-1111/प्र.क्र.08/सेवा3 दिनांक 11 मे 2017 मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी

परिणामी खालील तक्त्यातील सहाय्यक लेखाधिकारी वर्ग-3 या सेवानिवृत्त कर्मचा-यांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेची आश्वासित प्रगती योजना लागू करणेसाठीचे चे गठीत समितीचे बैठकीमध्ये तपासण्यात आली असुन सदर कर्मचारी पात्र आढळुन आलेले आहेत. त्यामुळे त्यांना दि.09/12/2016 चे शासन शुध्दीपत्रकातील तरतुदींनुसार 11 मे 2017 मधील शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या दुस-या लाभांतर्गत सहावा वेतन आयोगातील पदोन्नती साखळीतील वरिष्ठ पदांची वेतन संरचना वेतन ब्रॅण्ड पी.बी.9300-34800 ग्रेड वेतन 4600/- लागु करण्यात येत आहे.

...२

| अ. नं. | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | नेमणुक दिनांक | कालबध्द प्रगती योजनेअंतर्गत पहिला लाभ लागु केलेचा दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक | कालबध्द प्रगती योजनेचे लाभा नंतर 12 वर्ष सेवेचा कालावधी दिनांक | सुधारित सेवांतर्गत दुस-या लाभाकरिता पात्रतेचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | श्री.सोमनाथ लक्ष्मण लेंभे | सहाय्यक लेखाधिकारी | 18/11/1983 | 18/11/1995 | 31/08/2019 | 18/11/2007 | 18/11/2007 |

अटी व शर्ती -

1. वित्त विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील दि.09/12/2016 चे शासन शुध्दीपत्रकानुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा प्रत्यक्ष लाभ निवृत्तीवेतन / कुटूंबनिवृत्तीवेतन, सेवाउपदान, रजा रोखीकरण या प्रयोजनार्थ देण्यात यावेत अशी तरतुद असलेने उक्त कर्मचारी यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना दुसरा लाभ त्यानुसार मंजुर करण्यात येत आहे.
2. सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसरा लाभ मंजुर झाल्याने कर्मचा-यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम 1981 मधील नियम 11(1) नुसार करण्यात यावी. मात्र सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुस-या लाभाकरिता पात्रतेच्या दिनांकापासुन ते सेवानिवृत्ती दिनांकापर्यंत काल्पनिक वेतननिश्चिती करावी.
3. संबंधीत कर्मचारी यांना सुधारित सेवांतर्गत पात्रतेच्या लाभापासुन ते सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत सुधारित वेतनाची थकबाकीची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.
4. संबंधीत कर्मचारी यांचेकडुन उक्त अटी व शर्तीचे तसेच लाभामुळे अतिप्रदान रक्कमेची वसुली स्वत: व वारसास बंधनकारक असलेचे बंधपत्र घेण्यात यावे.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र.२०२५११२८०५००६८ असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-11-2025 16:55:42

आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.सोमनाथ लक्ष्मण लेंभे, सेवानिवृत्त सहाय्यक लेखाधिकारी,अर्थ विभाग,जि.प.अहिल्यानगर

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रत :- उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रत :- आस्था-२,अर्थ विभाग,जि.प.अहिल्यानगर.

स्वाक्षरीत/-
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर